MHWS080006962023

**निशाणी क्र.५५, ५७ व ५८ वरील एकत्रित आदेश**

अर्जदाराने नि.क्र.५५ वरील अर्ज हा गैरअर्जदाराचा उलटतपास घेण्यास मुदत मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. अर्जदाराने नि.क्र.५७ वरील अर्ज हा गैरअर्जदाराविरुध्द रु.७२५००/- चे वसूली वारंट काढण्याकरिता दाखल केलेला आहे. गैरअर्जदाराने नि.क्र.५८ वरील अर्ज हा अर्जदाराविरुध्द उलटतपास नाही चा आदेश पारीत करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. दोन्ही बाजूकडिल युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदाराचे कथन की, गैरअर्जदार हा नियमितपणे अंतरीम खावटीची रक्कम भरत नाही. त्यामुळे अर्जदारावर उपासमारिची वेळ आलेली आहे. आज अखेर रु.७२५००/- गैरअर्जदाराकडे अंतरीम खावटीची रक्कम थकीत आहे. त्यामुळे गैरअर्जदाराविरुध्द रु.७२,५००/- चे वसुली वारंट काढण्याची विनंती केलेली आहे. तसेच अर्जदाराचे पुढे कथन की, अर्जदाराकडून इतर माहिती घेण्याची असल्याने गैरअर्जदाराचा उलटतपास घेण्यास पुढील मुदत मिळावी ही विनंती केली आहे.

३. गैरअर्जदाराचे कथन की, गैरअर्जदार हा लडाख येथे नोकरीला आहे. त्याला सुट्टी मिळत नाही. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदाराचा उलटतपास घ्यावा. जर अर्जदार उलटतपास घेत नसतील तर त्यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करावा. गैरअर्जदाराचे पुढे कथन की, गैरअर्जदार प्रत्येक तारखेस अंतरीम खावटीची रक्कम भरत आहे, अर्जदाराचा पुर्वीचा वसुलीचा अर्ज प्रलंबीत आहे. तसेच अर्जदार दाखल तारखेपासून खावटी मागत आहे. त्यामुळे वसुली वारंटचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ नुसार प्रस्तुत प्रकरण दाखल केलेले आहे. नि.क्र.०५ वर अर्जदाराने अंतरीम खावटी मिळण्याचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज गुणदोषावर निकाली होऊन गैरअर्जदार क्र.१ यांना आदेशीत करण्यात आले की, त्यांनी अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिस दरमहा रक्कम रु. ४,०००/- मूळ प्रकरणाच्या अंतीम निकालापर्यंत द्यावेत. सदर आदेशाचे अनुषंगाने गैरअर्जदार यांनी नि.क्र.२३,२४,२६,२७,२९,३२,३५,३८,४१,४२,४३,४६,४८,४९, ५२ व ५३ वर अर्ज दाखल करुन आज अखेर रक्कम रु.४३,५००/- भरलेले आहेत व उर्वरित अंतरिम खावटीची रक्कम रु.७२,५००/- भरणे बाकी आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराचा पुरावा संपलेला असून नि.क्र.५४ वर गैरअर्जदाराचे पुराव्याचे शपथपत्र दि.१७/११/२०२५ रोजी दाखल केले आहे व गैरअर्जदाराचा उलटतपास घेणे बाकी आहे. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरण निकाली होईपर्यंत अंतरीम पोटगी भरणे गैरअर्जदार क्र.१ याची जबाबदारी आहे. गैरअर्जदार क्र.१ यांच्या कडुन आज अखेर अंतरीम पोटगी रक्कम रु.४३,५००/- भरण्यात आलेली आहे. अशा परिस्थीतीत गैरअर्जदार यांचाविरुध्द वसुली वारंट काढणे न्यायोचित होणार नाही. मात्र गैरअर्जदाराकडे रु.७२,५००/- अंतरीम खावटीची रक्कम थकीत आहे. कौंटुबिक हिंसाचारापासून महिलेचे संरक्षण या कायदयाचा उद्देश विचारात घेवून अर्जदारास अंतरीम खावटी मंजूर झालेली आहे. सदर प्रकरण सुरु असतांना सदर खावटीची रक्कम भरणे गैरअर्जदारास क्रमप्राप्त आहे. गैरअर्जदाराकडून रु.७२,५००/- थकीत रक्कम येणे बाकी आहे. सदर अंतरीम खावटीच्या रक्कमेशिवाय अर्जदारास प्रस्तुतचे प्रकरण चालविण्यासाठी परिस्थीती निर्माण करणे म्हणजेच भविष्यात मिळणा-या भक्कम व सबळ मागणीसाठी अर्जदार हिला सदरच्या परिस्थीतीत उपाशीपोटी न्यायालयीन लढाई लढण्यास परिस्थीती निर्माण करण्यासारखे होईल असे झाल्यास कायद्याचा व मुळ अर्जाचा हेतु सफलतेस जाणार नाही व त्यायोगे अर्जदारावर

अन्याय होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे एकूण थकीत रक्कमेच्या कमीत कमी २५% रक्कम गैरअर्जदाराने पुढील तारखेपर्यंत अर्जदारास द्यावी याबाबत आदेशीत करणे न्यायोचित होणार आहे. अन्यथा अर्जदारावर अन्याय होण्याची शक्यता आहे.

**५.** गैरअर्जदाराने नि.क्र.५४ वर दि.१७/११/२०२५ रोजी पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जदाराच्या अर्जातील कथनाप्रमाणे उलटतपास घेण्यास शेवटची संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे आजरोजी नि.क्र.५४ वर उलटतपास नाही, असा आदेश पारीत करणे योग्य व उचित होणार नाही. एकूणच प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थीती पाहता खालील प्रमाणे आदेश पारीत करेण न्यायोचित होणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. नि.क्र.५५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र.५७ व नि.क्र.५८ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतात.

३. गैरअर्जदार क्र. १ यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी एकूण थकीत अंतरीम खावटीच्या रक्कमेपैकी २५% रक्कम पुढील तारखेपर्यंत अर्जदारास देण्यात यावी.

४. अर्जदार यांनी पुढील तारखेस सकारात्मकरित्या गैरअर्जदाराचा उलटतपास घ्यावा अन्यथा योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

DINESH MUKUND GAIKWAD
Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2025.11.21 17:48:36 +0530

(**दिनेश मु. गायकवाड**)

दि.२१/११/२०२५ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **<u>Order.</u>**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date of order | : | 21/11/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 21/11/2025 |
| **Order uploaded on** | **:** | **21/11/2025** |